# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**



प्रेस नोट क्र-१३० दिनांक - ०२/०४/२०२४


## अंमली पदार्थाचे सेवन करणारे तसेच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई

मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ अधिनस्त काशिमीरा पोलीस ठाणे, काशिगांव पोलीस ठाणे, मिरारोड पोलीस ठाणे, नयानगर पोलीस ठाणे, नवघर पोलीस ठाणे, भाईंदर पोलीस ठाणे, उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीमध्ये अंमली पदार्थाचे सेवन करणारे इसमांवर तसेच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमांवर प्रभावीपणे कारवाई करण्याबाबत मा.पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांनी सुचना दिल्या होत्या मा.पोलीस आयुक्त यांचे सुचनाप्रमाणे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ दरम्यान अंमली पदार्थाचे सेवन करणारे इसमांवर तसेच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमांवर प्रभावीपणे कारवाई करण्यात येवुन मिरा-भाईंदर परिसरात परिमंडळ १ अधिनस्त पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस. कायद्यान्वये एकुण **२२५ गुन्हे** दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हयात एकुण **२४१ आरोपीतांवर कारवाई** करण्यात आली असुन त्याचेकडुन **एकुण ३३,४७,१००/- रुपयाचा अंमली पदार्थाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद कारवाई मा.पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पाण्डेय, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१ यांचे आदेशान्वये काशिमीरा पोलीस ठाणे, काशिगांव पोलीस ठाणे, मिरारोड पोलीस ठाणे, नयानगर पोलीस ठाणे, नवघर पोलीस ठाणे, भाईंदर पोलीस ठाणे, उत्तन सागरी पोलीस ठाणे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

मिरा-भाईंदर परिसरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपले परिसरामधील अंमली पदार्थाचे सेवन करणारे तसेच अंमली पदार्थाची विक्री करणारे इसम निदर्शनास आल्यास डायल ११२ वर कॉल करावा. तसेच स्थानिक पोलीस ठाणे यांचे निदर्शनास आणुन द्यावे. मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय अंमली पदार्थाचे सेवन करणारे इसमांवर तसेच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यासाठी कटीबध्द आहे.